# N 579

Seat No. | | | | | | | |

2024 III 04 1100 **-N 579 -** MARATHI (COMPOSITE) (A) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

**(REVISED COURSE)**

**Time : 2 Hours** **(Pages 14)** **Max. Marks : 40**

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :–**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.


(3) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-1 : गद्य

1. **(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

**(1)** आकृती पूर्ण करा : 2



डासांनी मग त्यांची जनरल बॉडी मीटिंग ठेवली. दासू-दासीचा अहवाल सगळ्यांनी ऐकला. सगळे गंभीर झाले. विचारविनिमय सुरू झाला. त्यांच्यातला एक डॉक्टर संशोधक पुढे आला. म्हणाला, "मी एक लोकल ॲनेस्थेशिया देणारं रसायन शोधलंय. आपल्या सुईवर ते लावायचं, की ती खुपसलेली त्याला कळायचंही नाही."

सगळ्यांच्या तोंडून एकदम 'वा!' असा उद्गार बाहेर पडला. डास पुढाऱ्यानं त्याला विचारलं, "त्याचं पेटंटबिटंट काही नाही ना ?"

"छे छे, तसं करायला आपण माणसं का आहोत ?" हशा उसळला.

तो पुढे म्हणाला, "ज्या वनस्पतीपासून ते रसायन मिळतं, त्या मुबलक आहेत आणि त्यांनी सहकार्य करायचं कबूल केलंय. शिवाय, आपल्या शरीरातल्या त्या जंतूंसाठी आपणच ती ॲंटिबायोटिक्स घेतली तर ? आता राहता राहिला प्रश्न आपल्या गुणगुणीचा. माझे त्यावर प्रयोग सुरू आहेत."

(2) एका वाक्यात उत्तर लिहा : 1

डासांच्या जनरल बॉडी मीटिंगमध्ये हशा का उसळला ?

(3) स्वमत : 3

पाठातील डास आणि माणूस यांच्यातील संवादाच्या आधारे डासांचे म्हणणे तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :


(1) चौकटी पूर्ण करा : 2

(*i*) काचेच्या खिडकीतून लेखकाकडे टक लावून पाहणारा –

(*ii*) लेखकाच्या पुरस्कारप्राप्त ग्रंथाचे नांव –

माझ्या ग्रंथाला राज्यपुरस्कार मिळाला, माझ्या व्याख्यानमाला गाजल्या, आदर्श प्राध्यापक म्हणून माझा गौरव झाला, मला डी. लिट मिळाली, राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून माझा सन्मान झाला, 'संतसाहित्यचिंतना'सारख्या माझ्या पुस्तकाला श्रेष्ठ संतसाहित्यविषयक ग्रंथाचा पुरस्कार मिळाला, मलां परदेशाची निमंत्रणं आली, की त्या बातम्या सांगणारी जी पत्रं नि तारा माझ्या टेबलावर येऊन पडत, ती पाकिटं फोडून या बातम्या मी प्रथम कुणाला सांगत असे ? काचेच्या खिडकीतून माझ्याकडे टक लावून पाहणाऱ्या मकबऱ्याला! मग मकबऱ्याचे मिनार मिस्कीलपणे हसत-डोलत. त्याचा घुमट तरारून येई. माझ्या यशानं त्यालाही तेज चढे. त्याच्या स्नेहशील दृष्टीच्या वर्षावात मी अखंड न्हाऊन निघत असे. माझ्या आयुष्यात या स्नेहाळ क्षणांना फार फार मोलाचं स्थान आहे. हे सारे क्षण मी माझ्या हृदयात खोल खोल जपून ठेवले आहेत.

(2) आकृती पूर्ण करा : 2




(3) जोड्या लावा : 2

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (*i*) मिस्कीलपणे हसणारे | (1) मकबरा |
| (*ii*) तरारून येणारे | (2) मिनार |
| | (3) घुमट |

**विभाग-2 : पद्य**

2. (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) आकृती पूर्ण करा : 2

सुगरणीच्या खोप्याला दिलेल्या उपमा

↓ ________ ↓ ________

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला।
पिलं निजले खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला।
खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा

| |
|---|
| पाखराची कारागिरी<br>जरा देख रे मानसा।<br>तिची उलूशीच चोच<br>तेच दात, तेच ओठ<br>तुले देले रे देवानं<br>दोन हात दहा बोटं। |

(2) **दिलेल्या काव्यपंक्तींचा सरळ अर्थ लिहा :** 2

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा।

**(आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) चौकटी पूर्ण करा : 2

(*i*) कवितेत आलेल्या नद्यांची नावे – ☐ ☐

(*ii*) मनातून वाहून जाण्यात अशा गोष्टी – ☐ ☐

हा देश माझा याचे, भान जरासे राहू द्या रे ॥धृ॥

हा उंच हिमालय माझा, हा विशाल सागर माझा
ह्या गंगा, यमुना, शेती, धरती, बागबगीचा माझा
अभिलाषा यांची धरिता, कुणी नजर वाकडी करता
या मरण द्यावया, स्फुरण आपल्या बाहू पावू द्या रे ॥१ ॥

जे हात उत्सुकलेले, दगडांच्या वर्षावाला
रोखा ते, लावा कार्याला, या देशाच्या प्रगतीला
हे बंद करा उत्पात, थांबवा आपुला घात
सामर्थ्य न जावो व्यर्थ, काहिसा अर्थही येऊ द्या रे ॥२॥

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती
परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणसुकीची नाती
द्या सर्व दूर ललकारी, फुंकारे एक तुतारी
संदेश रोष जे, द्वेष मनातील वाहून जाऊ द्या रे॥३॥

(2) खालील पंक्तींचा सरळ अर्थ लिहा : 2

जरी अनेक अपुले धर्म, जरी अनेक अपुल्या जाती

परी अभंग असू द्या, सदैव अपुली माणसुकीची नांती

## विभाग-3 : भाषाभ्यास

3. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

(1) पुढील वाक्याचा काळ ओळखून लिहा : 2

(*i*) हे पेन काहीसं वजनदार आहे.

(*ii*) इतिहासाची एक परिक्रमा पूर्ण झाली.

(2) वाक्प्रचार —

खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा : 2

| वाक्प्रचार | वाक्प्रचारांचे अर्थ |
|---|---|
| (*i*) भांबावून जाणे | (1) खूप प्रेम करणे |
| (*ii*) जिवापाड प्रेम करणे | (2) गोंधळून जाणे |
| | (3) आकर्षित करणे |

(आ) शब्दसंपत्ती :

(1) समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) चित्त – [ ]

(*ii*) मेघ – [ ]

(2) पुढील शब्दांतील अक्षरांवरून अर्थपूर्ण **दोन** शब्द तयार करा : 1

मिरवणूक

(3) खाली दिलेल्या शब्दांमधून अचूक शब्द ओळखा : 1

कठीण/कठीन/कठिण/कटीन

(4) खाली दिलेल्या विरामचिन्हांची नावे लिहा : 1

| | विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|---|
| (*i*) | ? | ........................ |
| (*ii*) | . | ........................ |

## विभाग-4 : उपयोजित लेखन

4. (अ) पत्रलेखन : 4

**नादीर स्पोर्टस्**

मंगळवार पेठ, कराड

खेळाचे साहित्य मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण

खेळाडूंसाठी आकर्षक सवलत

शैक्षणिक संस्थांसाठी विशेष सवलत

संपर्क – nadir801@gmail.com

व्यवस्थापक

योगेश/योगिता मोरे
विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

क्रीडा साहित्य खरेदीवर विशेष सवलत दिल्याबद्दल अभिनंदन करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

क्रीडा साहित्याची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकांना लिहा.

(आ) खालीलपैकी कोणतीही *एक* कृती सोडवा : 4

(*i*) गद्य आकलन :

खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न असे तयार करा, की ज्यांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात येतील :

ही एका खेड्यातील गोष्ट आहे. काही विचारी गावकऱ्यांनी गावात एक शाळा बांधली. त्यांचे स्वप्न होते, गावातल्या मुलांनी शाळेत जावे, खूप शिकावे, शहाणे व्हावे.

मुले शाळेत आनंदाने आली पाहिजेत, म्हणून त्यांनी शाळेजवळ खेळासाठी मैदान तयार केले. खेळाचे सामान आणले. शिक्षकसुद्धा नेमले पण शाळेत मुलेच येईनात. फक्त पाच-सहाच मुले आली. बाकीची मुले रानात जात, गुरे राखत, आईवडिलांना शेतीत मदत करीत.

गाडगेबाबांनी सर्व गावकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. मग त्यांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवले.

(*ii*) **जाहिरात :**

पुढील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा :

| | | |
|---|---|---|
| शाळांचे गणवेश | | रास्त किंमत |
| | भारत ड्रेसेस | |
| टिकाऊ | | सर्व वयो-गटांसाठी सर्व मापांचे |
| | दर्जेदार कापड | |

(*iii*) **बातमीलेखन :**

खालील विषयावर बातमी तयार करा :

**अभिनव विद्यालय, सोलापूर**

शालांत परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी

'शुभेच्छा समारंभ'

दि. 25 फेब्रुवारी, वेळ 11.00 वा.,

अध्यक्ष : मा. श्री. विजय जोशी

प्रमुख पाहुणे : मा. श्री. विशाल साठे (समाजसेवक)

(*iv*) **कथालेखन :**


खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा :

एक कोल्हा – भूक लागते – द्राक्षांची बाग – खाण्याची इच्छा – द्राक्षांचा वेल उंच – उड्या मारतो – थकतो – आंबट द्राक्षे –

(इ) **निबंधलेखन :**

खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंधलेखन करा : 4

(*i*) **वर्णनात्मक :**



(*ii*) **आत्मकथन :**

चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा :

